**<u>रे. दि. मु. नं. २८४/२०१३ मधील निशाणी क्र. ६२ चे अर्जावरील आदेश</u>**

वादींतर्फे प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात आवश्यक दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याकरता दाखल केला आहे. प्रतिवादींना पुरेशी संधी देऊनही त्यांनी प्रस्तुत अर्जाला त्यांचे म्हणणे दाखल केले नाहीत. म्हणून त्यांचे म्हणण्याशिवाय प्रस्तुतचे अर्ज गुणदोषावर निकाली काढण्यासाठी विचारात घेण्यात आला.

२) प्रस्तुत अर्जातील वादींचे थोडक्यात कथन असे की, सदर कामातील वादी क्र. २ यल्लाव्वा कल्लाप्पा जावीर ही दि. १७/०९/२०२३२ रोजी मयत झाली आहे. तिचे वारस वादी क्र. १ मालन दत्तात्रय घाडगे ही मुळातच अभिलेखावर आहे. त्याशिवाय अन्य कोणीही वारस नाही. असे अन्य कोणीही वारस निष्पन्न झाल्यास मे. न्यायालयाचे हुकुमाप्रमाणे त्यांना अभिलेखावर घेण्याची तजवीज वादी करत आहेत. सदर वारस अभिलेखावर येण्यासाठी दावा अर्जात दुरूस्ती ९० दिवसाच्या आत म्हणजे दि. १७/१२/२०२३ पूर्वी करणे गरजेचे होते. परंतु वादी हे अशिक्षित असल्याने त्यांना माहिती देणे असेते हे माहीत नव्हते. सदर कामी ०८ महिने ०३ दिवसांचा विलंब झाला आहे. सदर विलंब हा वादींकडून जाणूनबुजून कोणतीही झालेली नाही. नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने झालेला विलंब माफ होण्यास पात्र आहे. सबब, झालेला विलंब हा विलंब नसून केवळ तांत्रिक बाब आहे. सबब, तसा विलंब माफीचा व दावा उपशमचा आदेश रद्द करणेचा औपचारिक अर्ज दाखल केला आहे. तसेच सदरची दुरूस्ती ही अपरिहार्य, तांत्रिक व कारकुनी स्वरूपाची

आहे. त्यामुळे मूळ दावा अर्जाचे स्वरूपात कोणताही बदल होत नाही. सबब, वादी क्र. २ हिच्या नावास कंस करून 'मयत' असे लाल शाईने लिहिण्यास परवानगी असावी अशी विनंती वादींतर्फे करण्यात आली आहे.

३) अर्ज वाचला. वादीतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरण संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) प्रस्तुतचा दावा वाटपासाठी, कब्जा व दरम्यानचे उत्पप मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. स्थावर मिळकतीतील पक्षकारांचे हक्क व हितसंबंध या अनुषंगाने सदरचा दावा आहे. अर्जाचे पुष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. निशाणी क्र. ६५ सोबत अ.क्र. १ कडील दाखल मृत्युप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता वादी क्र. २ यल्लाव्वा कल्लाप्पा जावीर ही दि. १७/०९/२०२३ रोजी मयत असल्याची बाब स्पष्ट होते. तसेच, वादींतर्फे झालेल्या विलंबाबाबत जी इतर कारणे नमूद केली आहेत ती सारासार विवेकबुध्दीआधारे विचारात घेता येण्यासारखी आहेत. त्याचबरोबर प्रतिवादींनी मयत वादी क्र. २ हिचे वारस वादी क्र. १ ही असल्याची बाब नाकारलेली नाही. त्याचबरोबर निशाणी क्र. ६० वरील आदेशान्वये वादींना मयत वादी क्र. २ चे वारस अभिलेखावर आणण्यासाठीचा झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी व अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला अर्ज मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे सदरचे वादी क्र. २ चे वारस दाव्याचे कामी दावा दाखल करतानाच सामील असल्यामुळे वादी क्र. २ च्या मृत्यूमुळे दावा त्याचेबाबत अवसान पावतो असे होत नाही. वादी

क्र. २ चे वारस म्हणून वादी क्र. १ पूर्वीपासूनच दाव्यात सामील असल्याने वादी क्र. २ चे नावासमोर 'मयत' असे लिहिण्याकरिता करावयाची दुरूस्ती तांत्रिक स्वरूपाची आहे. तिच्यामुळे दाव्याच्या स्वरूपात बदल संभवत नाही. सदरची दुरूस्ती दावा प्रलंबित कालावधीत घडलेल्या तांत्रिक घटनेच्या अनुषंगाने असल्यामुळे ती मंजूर करण्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे परंतुकाचा प्रत्यवाय नाही. वरील सर्व कारणांचा विचार करून माझे असे मत आहे की, वादींचा सदर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुत अर्ज निशाणी क्र. ६२ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी क्र. २ चे नावासमोर 'मयत' असे लिहिण्यासाठीची दुरूस्ती मूळ दाव्यामध्ये करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादींनी सदर आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक त्या दुरुस्त्या मूळ दाव्यात ज्या त्या ठिकाणी वैधानिक कालावधीमध्ये करून घेऊन दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करण्याचे वादींना निर्देशित करण्यात येत आहे.

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2024.08.17 16:25:34 +0530

स्थळ:– जत (प्रकाश सी. बछले)
दि. १७/०८/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. प्रकाश सी. बछले,<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग<br>न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | १७/०८/२०२४ |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | १७/०८/२०२४ |
| आदेश अपलोड केलेली तारीख | १७/०८/२०२४ |